N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** वेदांत नगर

**Year (वर्ष):** 2025

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0114

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/06/2025 17:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 13/06/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 14/06/2025

**Time From (वेळेपासून):** 13:26 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/06/2025 **Time (वेळ):** 17:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 019

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/06/2025 17:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

नैऋत्य, 0.200 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वस्तु सेवा कर भवन, रेल्वे ,स्टेशन समोर, छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पंकज रमेश सुरासे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1993

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारापोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | काटे पिंपळगाव तागंगापूर,छत्रपती संभाजीनगर,शिल्लेगांव,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | काटे पिंपळगाव तागंगापूर,छत्रपती संभाजीनगर,शिल्लेगांव,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8788255200

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कांचन नामदेवराव कांबळे | | | 1. 701 रुबी इनसिग्निआ अपार्टमेंट,हमालवाडा रेल्वेस्टेशन परिसर ,छत्रपती संभाजीनगर, वेदांत नगर,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 40 हजार रुपये 500 रुपये दराच्या 80 नोटा थ्रासिन पावडर लावलेले. | 40,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

40,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 14/06/2025

मी माझे आजोबा नामे पंढरीनाथ गंगाधर सुरासे, परवानाधारक रास्त भाव दुकान क्र.29 मौजे काटेपिंपळगाव ता. गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर यांचे नावावरुन माझे वडील रमेश पंढरीनाथ सुरासे व मी पंकज रमेश सुरासे यांचे नावे वारसाने प्राधिकृत केलेल्या रास्त भाव दुकान चालविण्यांचे काम करतो. दिनांक 15/01/2025 रोजी अचानक आमचे रास्त भाव दुकान क्रमांक 29, मौजे काटेपिंपळगाव ता.गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर येथे तालुका पुरवठा अधिकारी श्रीमती कांबळे मॅडम व त्यांचे सोबत त्यांचे चालक व इतर स्टाफ असे भेट देणेसाठी आले. भेटी दरम्यान त्यांनी आमचे रास्त भाव दुकानाची पहाणी करुन पंचनामा केला. पंचनाम्यामध्ये तपासणी वेळी रास्तभाव दुकानास माहे जानेवरी 2025 साठीचे धान्य तालुका शासकिय गोदामातुन व्दारपोहोच झालेले नव्हते. तसेच माहे डिसेंबर 2024 चे ई पॉस मशीन व्दारे धान्य वितरणाची मुदत देखील संपलेली होती. माहे डिसेंबर 2024 चे धान्य वितरण होवून देखील प्रत्यक्ष तपासणी वेळी रास्तभाव दुकानात एकुण गहु 08 गोण्या (04 क्विं ट ल),व तांदुळ 19 गोण्या (09.50 क्विंटल) इतका शिल्लक साठा आढळुन आला.

सदर प्रकरण श्रीमती कांबळे मॅडम मला म्हणाल्या की, तुमचे रास्त भाव दुकानाचे प्राधिकार पत्र निलंबन करणे बाबतचा प्रस्ताव मी जिल्हा पुरवठा अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचेकडे पाठवणार असुन तुमचे रास्त भाव दुकानावर प्राधिकार पत्रावर निलंबन कारवाई करणार आहे. यावर मी त्यांना विनंती वजा बोलल्यावर त्यांनी मला 70,000/- रुपयांची मागणी केली ती मागणी मी पुर्ण न केल्याने त्यांनी दिनांक 27/02/2025 रोजी माझे रास्त भाव दुकानाचे प्राधिकार पत्र निलंबनाचा प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांना पाठवला. सदर प्रस्तावावर मी दिनांक 17/04/2025 रोजी मा.डी एस ओ, साहेब यांचे छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयात भेट घेवून त्यांना लेखी खुलासा सादर केला. मी दिनांक 08/05/2025 रोजी तालुका पुरवठा अधिकारी कांबळे मॅडम यांना भेट लो असता त्यांनी मला सांगीतले की, जर तु मला 70,000/- हजार रुपये आणुन दिले तर तुझ्या रेशनींग दुकानावर कारवाई करणार नाही आणि जर 70 हजार रुपये नाही दिले तर रास्त भाव दुकानाचे लायसन डी एस ओ साहेबांना सांगुन निलंबीत करुन टाकेन असे सांगीतले. मी त्यांनतर श्रीमती कांबळे मॅडम, तालुका पुरवठा अधिकारी यांना वारंवार भेटुन विनवणी करुनही पैसे दिल्याशिवाय ऐकणार नाहीत याची मला खात्री झाली.

मी दिनांक 13/06/2025 रोजी तालुका पुरवठा अधिकारी कांबळे मॅडम यांना भेटुन माझ्या रेशनींग दुकानाचे लायसन निलंबन न करणेसाठी चर्चा करणार आहे त्यावेळी तालुका पुरवठा अधिकारी कांबळे मॅडम हया त्यांचे साठी किंवा जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकरीता पैशाची मागणी केली तर आपण त्यांचे वर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे. मी सदर वेळी जिल्हाधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर पुरवठा विभाग यांचे कडुन दिनांक 10/11/2022 रोजीचे प्राधिकार पत्र, दिनांक 15/01/2025 रोजी तालुका पुरवठा अधिकारी कांबळे मॅडम यांनी माझ्या रेशन दुकानात केलेल्या पंचनाम्याची प्रत, दिनांक 27/02/2025 रोजी तहसिलदार गंगापूर यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांना रेशनींग दुकान लायसन निलंबन पत्र, दिनांक 26/03/2025 रोजीची जिल्हाधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर पुरवठा विभाग यांचेकडुन प्राप्त सुनावणी नोटीसची प्रत, दिनांक 17/04/2025 रोजी

मा.डी एस ओ. साहेब यांना सादर केलेल्या खुलाश्याची प्रत. मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी लाचलुचप
प्रतिबंधक विभाग कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे येवून तालुका पुरवठा अधिकारी कांबळे मॅडम यांचे विरुद्ध
तक्रार दिली. तालुका पुरवठा अधिकारी कांबळे मॅडम यांचेशी माझे कुठलेही वैयक्तीक वाद अथवा भांडण नाही किंवा
त्यांशी उसनवारीचा व्यवहार नाही.   सदरची तक्रार पोह जोशी यांनी माझे सांगणे वरुन संगणकावर टाईप केली. ती
मी वाचून पाहीली असुन ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

अशी तक्रार दिल्यावरुन दिनांक 13/06/2025 रोजी पोलीस निरीक्षक, वाल्मीक कोरे, पंच क्रमांक 01 आणि 02 लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील सापळा पथक यांचेसह लाचमागणी पडताळणी करणे करीता गंगापूर येथे आले. मला लाचमागणी पडताळणी संदर्भात योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पंच क्र.1 यांनाही सुचना देवून व्हाईस रेकॉर्डर नविन मेमरी कार्ड टाकून चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये लावला व त्यानंतर 13.26 वाजता मला व पंच क्र.01 यांना लाचमागणी पडताळणी करीता तहसिल कार्यालय गंगापूर येथील तालुका पुरवठा अधिकारी श्रीमती कांबळे मॅडम यांचे कार्यालयात पाठविले. कार्यालयात जावून पंच क्र.01 यांचेसह कांबळे मॅडम यांची भेट घेवून माझे राशन दुकानाचा निलंबन प्रस्ताव पाठविला आहे. सदरचे निलंबन प्रस्ताव रद्द करण्याच्या कामासंदर्भात बोलणी झाल्यानंतर मी व पंच क्र.01 असे सुरक्षित ठिकाणी परत 14.24 वाजता आलो. तेथे पोलीस निरीक्षक, वाल्मीक कोरे यांना कार्यालयात श्रीमती कांबळे मॅडम यांच्या बरोबर झालेल्या संभाषणाची मी व पंच क्र.01 यांनी माहीती दिली. सदर वेळी पोनि कोरे यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील कैद झालेले संभाषण ऐकले असता दिसुन आले की, अरे मी मघाशी साहेबांना बोलणारच होते .. साहेब आल्यानंतर त्याना कितीतरी वेळा बोलले.. जावून भेटले त्यांना बोलते.. की..40,000/- रु देवून काहीतरी करता येईल.. पण नंतर तु लय बिझी झाला. 25 हजार रुपये द्यावे लागतील DSO साहेबांना आणि 15 हजार रुपये मला.. 40 हजार बरोबर आहे लवकर करुन घे..कधीही कर.. जेव्हा तु शहरात येथील ना.. हो.. मला काय बाबावर .. रेल्वेस्टेशन.. गणेश पेठच्या आसपास.. तु कुठेही आलातर फोन कर..शक्यतोवर मीच येईल.. यावरुन पोनि कोरे यांना खात्री झाली की पुरवठा निरीक्षण अधिकारी कांबळे मॅडम यांनी माझ्याकडे 40 हजार रुपये लाचमागणी केली त्यापैकी 25 हजार डीएसओ साहेबांकरीता व स्वत: करीता 15 हजार रुपये अशी मागणी करुन उदया दिनांक 14/06/2025 रोजी छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये आल्यानंतर मला फोन कर त्यानंतर मी कुठे पैसे घेवून यायचे त्याबाबत सांगेन असे म्हणुन लाचमागणी केली आहे.दिनांक 13/06/2025 रोजी श्रीमती कांबळे मॅडम यांनी लाच मागणी केल्याप्रमाणे आज दिनांक 14/06/2025 रोजी मी माझे घरात असलेले बचतीचे 40 हजार रुपये 500 रुपये दराच्या 80 नोटा घेवून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आलो. लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात उपस्थित पोलीस निरीक्षक, श्री वाल्मीक कोरे व पंच क्र.01 आणि 02 यांचे समक्ष मी 40 हजार रुपये हजर केले. सदरची रक्कम श्रीमती कांबळे मॅडम यांना देणेसाठी लाचरक्कम म्हणुन वापरावयाची असल्याने सदर नोटांना माझे व पंच क्र. 01 व 02 यांचेसमक्ष ॲन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. तसेच दिनांक 13/06/2025 रोजीचे पंचनाम्या प्रमाणे आज देखील व्हाईस रेकॉर्डरचा वापर करावयाचा असल्याने व्हाईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते माझ्या शरीरावर लावले व श्रीमती कांबळे मॅडम यांना फोन केल्याप्रमाणे त्यानी सांगीतलेले ठिकाण वस्तु सेवा कर भवनचे गेट वर  रेल्वे स्टेशन जवळ, या ठिकाणी  पंच क्र.01 यांच्यासह माझे मोटार सायकलने टीव्हीएस स्टार सिटी एम एच 20 बी एस 4516 वाजता रवाना झालो. सदर ठिकाणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक श्री कोरे व इतर टिम माझ्या पुढे जावून सुरक्षित ठिकाणी थांबलेली होती. सदर ठिकाणी मी व पंच क्र.01 थांबलेलो असतांना श्रीमती कांबळे मॅडम ह्या त्यांची स्कुटी-एम एच 20 एफ एल 7570 क्रमांक असलेली हिरो कंपनीची डीओ मॉडेल असलेली दुचाकी 14.32 वाजेच्या दरम्यान सदर ठिकाणी आल्या व वस्तु सेवा भवन कार्यालयाच्या गेट च्या पुढे थोडया अंतरावर जावून थांबल्या व मला त्यांचा मोबाईल क्रमांक 7709027253 यावरुन फोन करुन बोलावले मी त्याच्या जवळ गेलो तेथे माझे व कांबळे मॅडमचे बोलणे झाले. त्यानंतर पुरवठा निरीक्षण अधिकारी कांबळे मॅडम यांनी लाचेची 40 हजार रुपये रक्कम स्कुटीची डिक्की मध्ये ठेवण्यास सांगीतले. मी सदर लाचेची रक्कम पंच क्र.01 यांचे समक्ष कांबळे मॅडम यांच्या डीओ गाडीच्या डिक्की मध्ये ठेवताच कांबळे मॅडम यांनी डिक्की वरील सिट त्यावर टाकताच मी सापळा पथकास तात्काळ नियोजित माझ्या गळ्यातील उपरणे काढुन पिशवीत ठेवल्याचा इशारा केला त्यावेळी आजुबाजुस साध्या वेषात असलेले सापळा पथकातील पोलीस निरीक्षक  कोरे महीला हवालदार दराडे , कुंटे , पोह जोशी,पोअं डोंगरदिवे व पोलीस उप अधिक्षक श्री.गोरखनाथ गांगुर्डे असे जवळ येवून महीला पोलीस हवालदार दराडे व कुं टे यांनी कांबळे मॅडम यास जागीच ताब्यात घेतले. सदर वेळी पोनि कोरे यांनी मला व पंच क्र.01 यांना लाचेची रक्कम कोठे आहे आणि कोणी स्विकारली या बाबत विचारणा केली असता त्यावेळी मी व पंच क्र.01 यांनी सांगीतले की, कांबळे मॅडम यांनी लाचेची रक्कम त्यांच्या कडील डीओ गाडीच्या डिक्कीमध्ये ठेवली आहे. सदर वेळी पोनि कोरे यांनी पंच क्र.02 यांना डिओ गाडीची डिक्की उघडुन पहाणी करणेस

सांगीतले वरुन दिसुन आले की, लाचेची रक्कम सदर डिओ गाडीच्या डिक्कीमध्ये ठेवलेली आहे. सदरची रक्कम पंच क्रमांक 2 हयांना पोनि कोरे यांनी ताब्यात घेण्यारा सांगितले असता पंच क्र 2 हयांनी लाच रक्कम ताब्यात घेवुन नोटांची खात्री करुन सापळा पुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोंटाचे क्रमांक तंतोतंत मिळुन आल्याचे कळविले. सदर वेळी पोलीस निरीक्षक, वाल्मीक कोरे यांनी स्वत:सह पंच, व सापळा पथकाची ओळख पटवुन कांबळे मॅडम यांना त्यांचा नाव पत्ता व हुददा विचारले असता त्यावेळी त्यांनी त्यांचे नाव कांचन नामदेवराव कांबळे,वय 34 वर्षे, पद पुरवठा निरीक्षण अधिकारी गंगापूर (वर्ग-2),रा. 701 रुबी इनसिग्नीआ अपार्टमेंट हमालवाडा रेल्वेस्टेशन परिसर छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले. सदर वेळी पंचा समक्ष कांबळे मॅडम स्कुटी-एम एच 20 एफ एल 7570 क्रमांक असलेली हिरो कंपनीची डीओ मॉडेल डिक्कीमध्ये अल्ट्रावाईट लॅम्पचा प्रकाश टाकुन तपासणी केली असता त्यांच्या डिक्कीमध्ये ॲन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोनि कोरे, यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील कैद झालेले संभाषण ऐकले असता एक फोन साहेबांना लावा..मी साहेबांना फोन लावु शकत नाही.. आज सुट्टी आहे.. साहेबांशी तु बोलणार का.. सोमवारी मी साहेबांना बोलणार आहे.. पटकन ठेव डिक्कीत..मी सेफ आहे ना.. असे दिसुन आले त्यावरुन खात्री झाली की, पुरवठा निरीक्षण अधिकारी कांबळे मॅडम यांनी माझ्याकडुन लाचेची 40 हजार रक्कम स्विकारली.

त्यानंतर पोनि कोरे यांनी घटनास्थळावर प्राथमिक कारवाई करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात येणार असल्याचे सांगितले.सदर कारवाई बाबत दिनांक 14/06/2025 रोजी यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा केला आहे.पोनि कोरे यांनी मला घडलेल्या घटनेबाबत सविस्तर फिर्याद दया असे सांगितल्याने मी वरिल प्रमाणे फिर्याद कथन केली केली असुन त्या प्रमाणे पोनि कोरे यांनी टंकलिखीत केलेली आहे.दिनांक 13/06/2025 रोजी 13.26 वा ते दिनांक 14/06/2025 14.45 वा दरम्यान नविन तहसिल कार्यालय  गंगापूर आणि वस्तु सेवा कर भवन, रेल्वे स्टेशन समोर, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी कांचन नामदेवराव कांबळे पुरवठा निरीक्षण अधिकारी वर्ग 2 नेमणुक तहसिल कार्यालय गंगापूर रा. 701 रुबी इनसिग्नीआ अपार्ट मेंट   हमालवाडा रेल्वेस्टेशन परिसर छत्रपती संभाजीनगर यांनी माझे राशन दुकान क्र.29 काटे पिंपळगाव ता.गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर या दुकानाचा तहसिलदार गंगापूर यांनी दिनांक 27/02/2025 रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचे पाठविलेला निलंबन प्रस्ताव मागे घेण्यासाठी स्वत:साठी 15 हजार रुपये व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या करीता 25 हजार रुपये असे एकुण 40 हजार रुपयांची मागणी करुन, 40 हजार रुपये लाच रक्कम आज दिनांक 14/06/2025 रोजी माझ्याकडुन पंच क्र.01 यांचे समक्ष वस्तु सेवा कर भवन, रेल्वे स्टेशन समोर, छत्रपती संभाजीनगर याठिकाणी स्विकारली असुन त्यांना रंगेहाथ पकडले आहे म्हणुन फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRAVINA TARACHAND YADAV(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be corre
recorded and a copy given to the complainant / informant free of co
खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि
तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in c**
**Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**

**Name (नाव):** PRAVINA TAR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

डयुटी ऑफीसर
पो. स्टे. वेदांतनगर
छत्रपती संभाजीनगर (शहर)